गोवादूत : पणजी – बुधवार, २ मार्च २०१६

# भाषा माणुसकीला चिरकाल टिकवते

## साहित्यिक प्रा. कृष्णाजी कुलकर्णी यांचे मत

दोडामार्ग, दि. १ (प्रतिनिधी)

कोणतीही भाषा ही आपल्या सामर्थ्यावर टिकत असते. ती कोणाच्या श्रेयावर मोठी होत नसते. आपण जिवंत असल्याची ती खूण आहे. माणसाच दिसणे हे व्यक्तिमत्त्व तर भाषा हे त्याचे दुसरे व्यक्तिमत्त्व असते. भाषेचे व्यक्तिमत्त्व माणसाला चिरकाल टिकवत असते, असे विचार ख्यातनाम साहित्यिक व समीक्षक प्रा. कृष्णाजी कुलकर्णी यांनी व्यक्त केले. ते येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय मराठी भाषा व वाङ्मय मंडळाने 'मराठी भाषा दिन' निमित्त आयोजित केलेल्या काव्यसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी ते पुढे म्हणाले की, माणसाला प्रथम कवितेची ओढ असते. तो कविता लिहू लागतो मात्र त्यात जोपर्यंत चिंतनशीलता येत नाही तो पर्यंत कविता पूर्ण होऊ शकत नाही. ही चिंतनशिलता आपल्याला शिक्षण घेतल्याने प्राप्त होते. केवळ पोटासाठी शिक्षण नसते, मराठी भाषेला उज्वल भवितव्य आहे. फक्त आपण सर्वांनी समृद्ध करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. कवी कुसुमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकर यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून संपूर्ण जगात मोठ्या आनंदात साजरा केला जातो. या निमित्त महाविद्यालयात भित्तिपत्रक, पोस्टर प्रदर्शन व महाराष्ट्र व गोव्यातील निमंत्रित कवींचे कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्ये तर व्यासपीठावर मुंबईच्या प्रसिद्ध कवयित्री संगीता अरबुणे, गोव्यातील चित्रा क्षीरसागर, दिपा मिरिंगकर, प्रा. कृष्णाजी कुलकर्णी, गझलकार प्रकाश क्षीरसागर आदी निमंत्रित कवी, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, मराठी भाषा व वाङ्मय मंडळाचे प्रमुख प्रा. दिलीप बर्वे उपस्थितीत मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या लोकगीतांचे लोकवेद: दोडामार्ग तालुक्यातील लोकगीते या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत, गोवा सरकारी मराठी अकादमीच्या सदस्य कवयित्री पौर्णिमा केरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आपल्या मनोगतात त्या म्हणाल्या की, भाषा मानवी भावभावनांचे कंगोरे नजाकतीने उलगडणारी, माणसांना माणसांशी जोडणारी, संदेशवहनांचे महत्त्वपूर्ण कार्य करते. बोली भाषेतून लोक साहित्यांचा भाषिक ठेवा जतन करण्याचे, महाविद्यालयाचा हे कार्य उल्लेखनीय आहे. 'लोकवेद' हा एक अभ्यासपूर्ण दस्तावेज आहे.



*लोकवेदचे प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर.*